# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः03.04.2026** **वारःशुक्रवार**

---

•जनविश्वास विधेयकला संसदेची मंजुरी; दोन्ही सभागृहांचं कामकाज येत्या १६ एप्रिलपर्यंत संस्थगित

•देशात कार्यकुशल आणि नागरिक केंद्रित प्रशासनाची गरज असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

•पेट्रोकेमिकल उत्पादनांवरचं सीमाशुल्क ३० जूनपर्यंत रद्द करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

आणि

•पुण्यासह विविध जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस; आगामी दोन दिवसही पावसाचा अंदाज

**<u>संसद</u>**

संसदेनं काल जनविश्वास विधेयक २०२६ मंजूर केलं. राज्यसभेनं काल या विधेयकाला मंजुरी दिली, लोकसभेत ते आधीच मंजूर झालं होतं. काही कायद्यांमध्ये दुरुस्ती करून काही गुन्हे 'अपराध' या श्रेणीतून वगळण्याची आणि त्यांना अधिक तर्कसंगत करण्याची तरतूद या विधेयकात आहे. यानंतर राज्यसभेचं कामकाज येत्या १६ एप्रिलपर्यंत संस्थगित करण्यात आलं.

केंद्रीय सशस्त्र पोलीस बल सामान्य प्रशासन विधेयकालाही काल संसदेनं मंजुरी दिली. या विधेयकाला काल लोकसभेची मंजुरी मिळाली; राज्यसभेत ते याआधीच मंजुर झालं होतं. केंद्रीय सशस्त्र पोलीस दलातले गट अ सर्वसाधारण कर्तव्य अधिकारी आणि इतर अधिकाऱ्यांची भरती आणि सेवेच्या अटींशी संबंधित सर्वसाधारण नियमांचं नियमन करणं, हे या विधेयकाचं उद्दिष्ट आहे.

हे विधेयक मंजूर झाल्यानंतर लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सभागृहाचं कामकाज या महिन्याच्या १६ तारखेपर्यंत संस्थगित केलं. काही महत्त्वाच्या विधेयकांवर चर्चा करण्यासाठी हे सत्र बोलावण्यात येत असल्याचं बिर्ला यांनी सांगितलं.

पंतप्रधान

देशाच्या आकांक्षा वेगाने बदलत असताना कार्यकुशल आणि नागरिक केंद्रित

प्रशासनाची गरज आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. कालपासून सुरू झालेल्या कर्मयोगी सप्ताहाला संबोधित करताना ते बोलत होते. क्षमता विकास आयोग आणि मिशन कर्मयोगी हे प्रत्येक भारतीयाच्या आकांक्षांशी सुसंगत, आधुनिक, समर्पित आणि प्रतिसादक्षम मनुष्यबळ तयार करण्याच्या कार्यात महत्त्वपूर्ण ठरत असल्याचं, त्यांनी नमूद केलं. विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी “नागरिक देवो भव”; या मूलमंत्राचा अंगीकार करुन

सार्वजनिक सेवा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जात

असल्याचं पंतप्रधानांनी सांगितलं.

राज्यातही सर्व जिल्ह्यांमध्ये केंद्र सरकार, क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या वतीनं कालपासून साधना सप्ताह सुरू करण्यात आला आहे. ८ एप्रिलपर्यंत सुरू राहणाऱ्या या उपक्रमात सर्व अधिकारी- कर्मचाऱ्यांनी आपली कार्यक्षमता वाढवावी, आणि 'iGOT कर्मयोगी भारत' पोर्टलवर लॉग इन करुन किमान ४ तासांचे अभ्यासक्रम पूर्ण करावेत, असे निर्देश देण्यात आले आहेत.

**<u>सीमाशुल्क</u>**

महत्त्वाच्या पेट्रोकेमिकल उत्पादनांवरचं सीमाशुल्क ३० जूनपर्यंत संपूर्णपणे माफ करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. केंद्रीय अप्रत्यक्ष कर आणि सीमा शुल्क मंडळाचे सदस्य संजय मंगल यांनी काल नवी दिल्लीत आंतर मंत्रालयीन पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. या सवलतीमुळे प्लास्टिक, वस्त्रोद्योग, औषधनिर्माण यांसारख्या अनेक क्षेत्रांना फायदा होईल असं ते म्हणाले.

**<u>उद्योगांनाएलपीजी</u>**

पश्चिम आशियातील युद्धामुळे एलपीजी गॅसच्या जागतिक तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील स्वदेशी उद्योगाबरोबर परदेशी गुंतवणुकीच्या उद्योगांना तसंच नागरिकांना गॅसचा पुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी राज्य शासन आवश्यक ते सर्व प्रयत्न करत आहे, असं राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी काल सांगितलं. या संकटात कोणत्याही उद्योगाला राज्य शासन अडचण येऊ देणार नाही, असंही त्यांनी स्पष्ट केलं. पुण्यातील परदेशी गुंतवणुकीच्या उद्योगांना एलपीजी पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी स्वीडन, जपान आणि दक्षिण कोरियाच्या महावाणिज्य दूतांच्या विनंतीवरून मुंबईत काल एक बैठक झाली; त्यावेळी रावल बोलत होते. कोणत्याही उद्योगाला

राज्य शासन अडचण येऊ देणार नाही अशी ग्वाही रावल यांनी यावेळी दिली. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार एलपीजीचं टप्प्याटप्प्याने वितरण सुरू असून प्राधान्य क्षेत्रांना दिलासा देण्यात येत असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>शिवपुण्यतिथी</u>**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची काल तिथीनुसार पुण्यतिथी होती. यानिमित्त राज्यभर शिवरायांना आदरांजली वाहण्यात आली. अनेक नागरिकांनी दुर्गदुर्गेश्वर रायगडासह राज्यातील विविध गड-किल्ल्यांना भेट देऊन छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केलं.

**<u>हनुमान जयंती</u>**

चैत्र पौर्णिमेनिमित्त काल राज्यभरात सर्वत्र हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. राज्यातील सर्व हनुमान मंदिरात सकाळी सहा वाजता जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्तानं विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजनही करण्यात आलं होतं.

**<u>गुडफ्रायडे</u>**

येशू ख्रिस्ताच्या बलिदानाचं स्मरण करणाऱ्या गुड फ्राय डे निमित्त आज देशभरातील विविध चर्चमध्ये विशेष प्रार्थना सभांचं आयोजन करण्यात आलं आहे.

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात

**<u>गुहागर कासव महोत्सव</u>**

रत्नागिरी जिल्ह्यातल्या गुहागरच्या किनाऱ्यावर आजपासून कासव महोत्सवाला सुरुवात झाली असून, तो संपूर्ण एप्रिल महिनाभर सुरू राहणार आहे. त्याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

मार्च-एप्रिलच्या काळात कोकणातल्या किनाऱ्यांवर निसर्गाचा एक अनोखा आविष्कार सुरू असतो. नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात ऑलिव्ह रिडले कासवांच्या माद्यांनी इथल्या किनाऱ्यांवर घातलेल्या अंड्यांमधून पिल्लं बाहेर येण्याचा हा काळ असतो. अत्यंत देखणी अशी ही इवलीशी पिल्लं अंड्यातून बाहेर आल्या आल्या अनावर ओढीने अथांग सागर कवेत घेण्याच्या ध्येयाने चालू लागतात. हा अनुपम्य सोहळा पर्यटकांना अनुभवता यावा यासाठी कासव महोत्सव

आयोजित केले जातात. कासव संवर्धनाचं हे कार्य गुहागरमध्येही सुरू असून, गेल्या दोन वर्षांत या कासवांची सर्वाधिक घरटी आणि अंडी इथल्या किनाऱ्यांवर आढळली आहेत. म्हणूनच गुहागरमध्ये यंदा संपूर्ण एप्रिल महिनाभर चालणाऱ्या कासव महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. यंदा इथे सहा कासव संवर्धन केंद्रं उभारण्यात आली असून, घरट्यांची संख्या १८६ आहे. या कालावधीत पर्यटकांना पिल्लं बाहेर येण्याच्या वेळेनुसार पहाटे किंवा संध्याकाळी या अनोख्या निसर्गाविष्काराचा अनुभव घेता येईल. संरक्षित श्रेणीतल्या या कासवांच्या आश्चर्यकारक अशा जीवनचक्राची माहितीही या वेळी दिली जाणार आहे. गुहागरच्या किनाऱ्याला अलीकडेच आंतरराष्ट्रीय दर्जाचं ब्लू फ्लॅग मानांकन मिळालं आहे. त्या पार्श्वभूमीवर, कांदळवन विभाग आणि नगरपंचायतीने आयोजित केलेला हा कासव महोत्सव पर्यटनाला चालना देणारा ठरणार आहे.

आकाशवाणीच्या बातम्यांसाठी अनिकेत कोनकर, रत्नागिरी

**<u>अशोक खरातला कोठडी</u>**

महिलांचे शोषण करणाऱ्या भोंदू बाबा अशोक खरातला आठ एप्रिल पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने दिले आहेत. खरात त्याच्यावर पहिला गुन्हा दाखल झाल्यानंतर त्याला तीन वेळा पोलीस कोठडी मिळाली होती त्यानंतर काल एका दुसऱ्या गुन्ह्यामध्ये पुन्हा न्यायालयीन कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

**<u>निधन</u>**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ स्वयंसेवक आणि माजी पुणे महानगर कार्यवाह मकरंद लेले यांचं काल पुण्यात निधन झालं. ते 77 वर्षांचे होते. राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेतल्या सेवे नंतर त्यांनी राष्ट्रीय संयंसेवक संघाच्या कामात स्वतःला झोकून दिलं होते. कार्यकर्त्यांची मोठी फळी निर्माण करण्यासोबतच विविध सामाजिक प्रकल्पांच्या उभारणीत त्यांचा मोलाचा सहभाग होता.

**<u>पाऊस</u>**

पुण्यासह कोल्हापूर, सांगली, सातारा, अहिल्यानगर, आणि गडचिरोली जिल्ह्यात काल सोसाट्याचा वारा आणि मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडला.

पुणे आणि पिंपरी चिंचवड शहराला तर काल दुपारी पावसाने अक्षरश: झोडपून काढलं. सोसाट्याचा वारा आणि विजांच्या कडकडाटासह झालेल्या मुसळधार पावसामुळे शहर जलमय झालं होतं. शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाहनकोंडी झाल्याने अनेक ठिकाणची वाहतूक पर्यायी मार्गांनी वळवण्यात आली होती. अनेक ठिकाणी झाडं पडली. सिंहगड रस्ता भागात झाड पडून एका महिलेचा मृत्यू झाल्याचं वृत्त आहे.

काल झालेल्या जोरदार पावसानंतर पुणे शहरातील धोकादायक झाडे आणि फांद्या हटविणे, झाडांची छाटणी करणे, तसंच नाले आणि गटारांची तातडीने स्वच्छता करण्याची कामं युद्धपातळीवर हाती घेण्याचे निर्देश महापौर मंजूषा नगपुरे यांनी दिले आहेत.

दरम्यान पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही अवकळी पाऊस पडला; या पावसाने शेती पिकांचं नुकसान झालं आहे. दरम्यान, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल भोर तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतीची पाहणी केली.

**<u>पाऊस</u>**

नाशिक शहरासह जिल्ह्यात काल मुसळधार पावसाबरोबरच गारपीट देखील झाली. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. नाशिकमध्ये वीज पुरवठा खंडित झाला; ग्रामीण भागात कांदा आणि द्राक्ष पिकांचे या पावसामुळे नुकसान झाले आहे.

**<u>हवामान</u>**

येत्या दोन दिवसात कोकणात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह

सोसाट्याचा वारा वाहण्याचा अंदाज आहे. तर मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**